# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक २२९/२०२४ दिनांक-१९/०६/२०२४

## Credit Card द्वारे ऑनलाईन फसवणूक झालेली रक्कम ७७,६८८/- रुपये परत करण्यात सायबर पोलीस ठाणेस यश !!

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील काशिमिरा पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार नामे श्री. चंपालाल यांना अनोळखी मोबाईल धारकाने फोन केला. त्यानंतर त्यांचे क्रेडिट कार्डाचे व्यवहार चालु ठेवण्याकरीता क्रेडिट कार्डाची माहिती देण्यास सांगितले. तक्रारदार यांनी माहिती दिली असता त्याचे क्रेडिट कार्डाचे खात्यातुन आर्थिक फसवणुक झालेबाबत सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्रमांक ६९० -बी/२०२४ दिनांक ११/०३/२०२४ अन्वये प्राप्त करण्यात आला आहे.

नमुद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. सदरची फसवणूक रक्कम **Amazon** च्या मर्चंड च्या अकाऊंटवर गेल्याचे दिसून आले. सायबर पोलीस ठाणेकडून तात्काळ पत्रव्यवहार करून व सातत्यपुर्ण पाठपुरावा करून नमूद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली. सायबर पोलीस ठाणेकडून तात्काळ केलेल्या पत्रव्यवहार व पाठपुराव्यामुळे सदरची **फसवणूक रक्कमेपैकी ७७,६८८/- रुपये** पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**<u>अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...</u>**

- **बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **अनोळखी लिंक, ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ,पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर,मपोअं/अमिना पठाण, मपोअं/सुवर्णा माळी, मपोहवा/माधुरी धिंडे, पोअं/राहुल बन, पोअं/कुणाल सावळे, मसुब/ राजेश भरकडे, मसुब/ आकाश बोरसे यांनी पार पाडली आहे.

सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in

------------000000-----------